दै. देशोन्नती दि. 12.03.2025

# गुरुद्वारा परिसरानंतर वजिराबादमध्ये अतिक्रमणावर बुल्डोजर फिरविले

देशोन्नती वृत्तसंकलन

**उपायुक्त अजितपालसिंघ संधू यांची कारवाई**

**अतिक्रमण केलेल्या व्यापाऱ्यांत खळबळ; तीन ट्रॅक्टर साहित्य जप्त**




**नांदेड :** गुरुद्वारा परिसरातील फुटपाथवर अतिक्रमण करून भाविकांना अडथळा निर्माण करण्यात येत होतो. याची गंभीर दखल महापालिका प्रशासनाने घेतली. या परिसरातील अतिक्रमणावर थेट बुल्डोजर फिरविण्यात आले. त्यानंतर मंगळवारी वजिराबाद भागामध्ये १३ अतिक्रमण केलेल्या ठिकाणचे तीन ट्रॅक्टर साहित्य जप्त करून त्याच्यावर बुल्डोजर फिरविण्यात आल्यामुळे व्यापाऱ्यांत एकच धावपळ उडाली.

मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त अजितपालसिंघ संधू यांच्या नेतृत्वाखाली अतिक्रमणविरोधी पथक व पोलिस विभागाने संयुक्त कारवाई करत वजिराबाद भागात अतिक्रमणाविरूध्द बुल्डोजर फिरविले आहे. पथकाने साहित्य जप्त करून त्यावर बुल्डोजर फिरविल्याने व्यापाऱ्यांत चांगलीच खळबळ उडाली. यावेळी उपायुक्त संधू यांनी व्यापाऱ्यांनी फुटपाथवर अतिक्रमण करू नये, अन्यथा धडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला. यावेळी अग्निशमन अधिकारी केरोजी दासरे, अतिक्रमण विभागाचे पथकप्रमुख विशाल सोनकांबळे, अनिल चौदंते, फौजदार गुट्टे यांच्या पथकांचा सहभाग होता.

दै. गोदातीर दि. 12.03.2025

# अवैध वाहतूक करणारा वाळूचा टिप्पर कुंडलवाडी पोलिसांनी घेतला ताब्यात

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)-** कुंडलवाडी ते पिंपळगाव रोडवर संत कबीर विद्यालय पिंपळगाव परिसरात वाळूची चोरटी वाहतूक करतांना कुंडलवाडी पोलिसांनी टिप्पर ताब्यात घेतला. या प्रकरणी कुंडलवाडी ठाण्यात चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दि. ११ मार्च रोजी सकाळी १०.४५ वाचता कुंडलवाडी ते पिंपळगाव रोडवर संत कबीर विद्यालय येथे चोरटी वाहतूक करणारा वाळूचा टिप्पर (जीजे ३६ टीएस ५२११) कुंडलवाडी पोलिसांनी पकडला. या वाहनामध्ये पाच ब्रास वाळू आढळून आली. टिप्पर व वाळू असा १८ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस कॉन्स्टेबल रवींद्र देशमुख यांच्या फिर्यादीवरून वाहन चालक धम्मानंद सोनकांबळेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत स.पो.नि. आरसेवार विशेष पथक, पो. का. मुदिराज, पो. का इंदेपवाड, स. पो. नि शिंदे, पो. ह शंकर चव्हाण, पो. का. रवींद्र देशमुख, पो. का. अमर शिंदे समावेश होता. तर सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी सहभाग घेतला.